धुळे जिल्हा परिषद व त्याअंतर्गत ४ पंचायत समित्यांच्या निवडणूका-२०१९ साठी प्रभाग रचनेचा कार्यक्रम

सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक तात्काळ

क्रमांक :- रानिआ/जिपपंस-२०१९/प्र.क्र.५/ का.७
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ३० मार्च,२०१९.

प्रति,
१) विभागीय आयुक्त, नाशिक
२) जिल्हाधिकारी, धुळे

**विषय** :- धुळे जिल्हा परिषद व त्याअंतर्गत ४ पंचायत समित्यांच्या निवडणूका-२०१९ साठी प्रभाग रचनेचा कार्यक्रम.
(मुदत समाप्तीचा दिनांक अनुक्रमे २९/१२/२०१८ व २७/१२/२०१८)

**संदर्भ** :- १) राज्य निवडणूक आयोगाचे क्र. रानिआ/जिपपंस-२०१८/प्र.क्र.१८/ का.७, **दि. २७ जुलै, २०१८ चे पत्र.**
२) मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्र.६६७६/२०१६ व ५३३३/२०१८ मधील मा. न्यायालयाचा दिनांक २७/०८/२०१८ रोजीचा निर्णय
३) मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्र.९९१४/२०१८ व १०५४३/२०१८ मधील मा.न्यायालयाचा दिनांक १९/०९/२०१८ रोजीचा निर्णय
४) राज्य निवडणूक आयोगाने प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांना पाठविलेले समक्रमांकाचे दिनांक ०९ सप्टेंबर, २०१८ व १० जानेवारी, २०१९ रोजीची पत्रे
५) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/जिपपंस/२०११/ प्र.क्र.१२/का.७, दिनांक २९/०९/२०११
६) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक. रानिआ/जिपपंस-२०११/ प्र.क्र.१४/का.७, दि.०४/१०/२०११ व दि.११/०६/२०१४

महोदय,

भारतीय घटनेच्या ७३ व ७४ व्या घटना दुरुस्ती अन्वये राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका, त्यांच्या मुदत संपण्यापूर्वी निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात घेण्याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

२.	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे तीन टप्प्यांसाठी (प्रभाग रचना, विधानसभा मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन व प्रत्यक्ष निवडणुका) लागणाऱ्या सुमारे ६ महिन्याचा कालावधी लक्षात घेता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्र व हद्दी मध्ये ६ महिने शिल्लक असताना बदल करण्यात येऊ नये, असे राज्य निवडणूक आयोगाने दि. २७/०१/२००५ रोजी स्थायी आदेश निर्गमित केले आहेत.

३.	धुळे जिल्हा परिषद व त्याअंतर्गत ४ पंचायत समितीच्या मुदती अनुक्रमे २९/१२/२०१८ व २७/१२/२०१८ रोजी संपत असल्याने राज्य निवडणूक आयोगाने पत्र क्र. रानिआ/जिपपंस-२०१८/प्र.क्र.१८/का.७, दि. २७ जुलै, २०१८ द्वारे जिल्हाधिकारी यांना प्रभाग रचना व आरक्षण करण्यासाठी आदेशित केले.

४.१	दरम्यानच्या काळात "५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षणाबाबत" धुळे जिल्हा परिषदेकरिता मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे क्रमांक- ९९१४/२०१८ व १०५४३/२०१८ अशा दोन रिट याचिका दाखल झाल्या. मा. उच्च न्यायालयाने दिनांक ३१/८/२०१८ रोजी धुळे जिल्हा परिषदेच्या प्रभाग रचनेच्या कार्यवाहीस स्थगिती दिली.

४.२	हया काळात नागपूर, वाशिम व अकोला जिल्हा परिषदेच्या निवडणुकीकरिता वरील विषयावर दाखल झालेल्या दोन रिट याचिका क्रमांक-६६७६/२०१६ व ५३३३/२०१८ मध्ये मा. उच्च न्यायालय, नागपूर यांनी दिनांक २७/८/२०१८ रोजी खालीलप्रमाणे निकाल दिला होता :-

| अ. क्र. | जिल्हा परिषद | रिट याचिका क्र. | निकालाचा दिनांक व निकाल |
|---|---|---|---|
| १ | नागपूर | ६६७६/२०१६ | **दि. २७/८/२०१८** - जिल्हापरिषदांमध्ये ५० टक्के पेक्षा जास्त आरक्षणाबाबत राज्य शासनाने ३ महिन्यांच्या आत निर्णय घ्यावा व तोपर्यंत निवडणुका घेऊ नये. |
| २ | वाशिम व अकोला | ५३३३/२०१८ | |

४.३	मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद यांनी याचिका क्रमांक- ९९१४/२०१८ व १०५४३/२०१८ या रिट याचिकांमध्ये नागपूर खंडपीठाच्या वरील निकालाप्रमाणे दिनांक १९/९/२०१८ रोजी निकाल दिला. या आदेशात राज्य शासनाने ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षणाबाबत तीन महिन्यांच्या आत

निर्णय घ्यावा व तोपर्यंत राज्य निवडणूक आयोगाने निवडणुका घेऊ नये, असे मा. उच्च न्यायालय यांनी आदेशित केले.

५. राज्य निवडणूक आयोगाचे पत्र दि. २७ जुलै, २०१८ अन्वये धुळे जिल्हा परिषदेच्या प्रभाग रचनेची कार्यवाही चालू असताना मा. उच्च न्यायालयाचे स्थगिती आदेश दि. ३१/८/२०१८ रोजी प्राप्त झाल्यावर प्रभाग रचनेची पुढील कार्यवाही थांबविण्यात आली. मात्र दि. ३१/८/२०१८ पर्यंत प्रभाग रचनेचा चौथा टप्पा- " सोडतीनंतर प्रारुप प्रभाग रचना (आरक्षणासह) राजपत्रात इ.प्रसिध्द करणे " पर्यंत कार्यवाही पूर्ण झालेली होती.

६.१ भारतीय संविधानातील अनुच्छेद २४३E व २४३K खालीलप्रमाणे आहे :-

**Article 243E**

......Every Panchayat, unless sooner dissolved under any law for the time being in force, shall continue for five years from the date appointed for its first meeting and no longer .........

......An election to constitute a Panchayat shall be completed,- before the expiry of its duration .........

**Article 243K**

........The superintendence, direction and control of the ...... conduct of, all elections to the Panchayats shall be vested in a State Election Commission .........

६.२ संविधानातील वरील तरतुदीवरुन स्पष्ट होते की, कोणतीही स्थानिक स्वराज्य संस्था फक्त ५ वर्षापर्यंत अस्तित्वात राहू शकते. तसेच सदर संस्थेची निवडणूक ५ वर्षाच्या आत राज्य निवडणूक आयोगाने घेणे क्रमप्राप्त आहे.

६.३ वरील वस्तुस्थिती लक्षात घेता मा. उच्च न्यायालयाने राज्य शासनास दिलेली मुदत संपली असल्याने व त्यात कसलीही मुदतवाढ झाली नसल्याने धुळे जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत पंचायत समित्यांच्या निवडणूका घेण्यासंदर्भात कसलेही बंधन येत नाही या निष्कर्षापर्यंत राज्य निवडणूक आयोग पोहचला आहे.

७.	धुळे जिल्हा परिषद व त्याअंतर्गत पंचायत समितीच्या क्षेत्र व हद्दीमध्ये दि. २७/७/२०१८ पासून कसलेही बदल न झाल्यामुळे तसेच २०११ च्या जनगणनेच्या आधारे निवडणूका असल्यामुळे जिल्हा परिषदेकरिता देय असलेली एकूण सदस्य संख्या ५६ यामध्ये कसलाही बदल होत नाही. जिल्हाधिकारी यांनी "चौथा टप्पा" पुर्ण केलेला आहे. वरील बाबी लक्षात घेता, जिल्हाधिकारी धुळे यांनी प्रभाग रचना करण्याबाबत खालीलप्रमाणे आदेश व परिशिष्टामध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यक्रम देण्यात येत आहे :-

**आदेश**

८.	प्रभाग रचना करण्याचे खालील मुख्य टप्पे आहेत :-

(i)	जिल्हाधिकारी यांनी प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव (अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता आरक्षित प्रभागासह) तयार करणे व विभागीय आयुक्त यांना सादर करणे.

(ii)	विभागीय आयुक्तांनी प्रारुप प्रभाग रचनेस (आरक्षणासह) मान्यता देणे.

(iii)	जिल्हाधिकारी यांनी नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील / सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांसह) आरक्षणाची सोडत काढणे.

(iv)	सोडतीनंतर प्रारुप प्रभाग रचना (आरक्षणासह) राजपत्रात इ. प्रसिध्द करणे.

(v)	जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर विभागीय आयुक्त यांनी सुनावणी देणे.

(vi)	विभागीय आयुक्त यांनी अंतिम प्रभाग रचनेस मान्यता देणे व त्यानुसार जिल्हाधिकारी यांनी अंतिम प्रभाग रचनेची अधिसूचना राजपत्रात इ. प्रसिध्दी देणे.

९.	वरील ६ पैकी ४ टप्पे पूर्ण झाल्यामुळे प्रभाग रचना करताना जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्त यांनी वरील ८(v) व ८(vi) प्रमाणे पुढील कार्यवाही करावी :-

(a)	**प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर सुनावणी देणे:-**

(i)	जिल्हा परिषद, पंचायत समिती प्रारुप प्रभाग रचनेवर विहित मुदतीत प्राप्त

हरकती जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांनी संकलित करुन त्या विभागीय आयुक्तांना सादर कराव्यात.

(ii) प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त हरकतींवर विभागीय आयुक्त यांनी स्वत: सविस्तर सुनावणी दयावी. असे करीत असताना जास्तीत जास्त पारदर्शकता राखली जाईल याची काळजी घ्यावी. निकाली काढण्यात येणाऱ्या हरकतींबाबतही, संबंधितांना कायदयातील तरतुदी, भौगोलिक रचना, बदलांची आवश्यकता / अनावश्यकता यांच्याआधारे योग्य तो खुलासा करावा, जेणेकरुन न्यायप्रविष्ठ प्रकरणे कमी होतील. मात्र हरकतदारांना लेखी उत्तर देण्याची आवश्यकता नाही.

(iii) सुनावणीनंतर विभागीय आयुक्त यांनी निवडणूक विभाग / निर्वाचक गणाची प्रभाग रचना व आरक्षण अंतिम करावे.

(b) **अंतिम प्रभाग रचनेस मान्यता देणे व प्रसिध्दी करणे-**

विभागीय आयुक्त यांनी निवडणूक विभाग / निर्वाचक गणाची प्रभाग रचना व आरक्षण अंतिम केल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी त्यासंबंधीची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द करावी व सदर अधिसूचनेस व्यापक प्रसिध्दी द्यावी. (उदा. वृत्तपत्रे, जिल्हाधिकारी तसेच तहसिल कार्यालयाचे नोटीस बोर्ड, वेबसाईट इत्यादी.) तसेच अंतिम प्रभाग रचनेच्या राजपत्रात प्रसिध्द झालेल्या अधिसूचनेच्या दोन प्रती राज्य निवडणूक आयोगास पाठविण्यात याव्यात.

१०. सर्वसाधारण या आदेशासंदर्भात कोणतीही अडचण अथवा शंका असल्यास यासंदर्भात खुलासा करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाचे असतील.

११. जिल्हा परिषद व पंचायत समित्यांची प्रभाग रचना अंतिमरित्या प्रसिध्द होईपर्यंत सर्व टप्प्यांवरील माहिती (विहित नमुन्यात) आयोगाच्या कार्यालयास ई-मेल sec.mh@gov.in वर वेळच्यावेळी पाठविण्यात यावी.

१२. वरील नमूद प्रकरणांबाबत न्यायालयाचे अन्य काही आदेश असल्याबाबत जिल्हाधिकारी यांनी खातरजमा करावी आणि जर काही न्यायालयाचे आदेश असतील तर त्वरित राज्य निवडणूक आयोगाच्या निदर्शनास आणावेत.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :- प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम इमारत, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई -४०० ००१

**परिशिष्ट**

( आयोगाचे पत्र क्र.रानिआ/जिपपंस-२०१८/प्र.क्र. १८/का.७, दि.                सोबतचे परिशिष्ट)

**धुळे जिल्हा परिषद व त्याअंतर्गत ४ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता टप्पा क्र ब) प्रारुप प्रभाग रचना व आरक्षणाची अधिसूचनेसंदर्भात हरकती सादर करणे व त्यापुढील टप्प्यांसाठी सुधारीत कार्यक्रम**

| अ.क्र. | टप्पा | कार्यवाही कोणी करावयाची आहे | टप्पा सुरु करण्याचा / संपविण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | **ब) हरकती व सूचना तसेच सुनावणी** | | |
| १. | जिल्हाधिकारी यांच्याकडे हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी | - | ०२/०५/२०१९ (गुरुवार) ते ०६/०५/२०१९ (सोमवार) पर्यंत |
| २ | प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर सुनावणी देऊन निवडणूक विभाग /निर्वाचक गण रचना अंतिम करणे | विभागीय आयुक्त | १०/०५/२०१९ (शुक्रवार) पर्यंत |
| | **क) अंतिम प्रभाग रचना** | | |
| ३. | अंतिम प्रभाग रचना व आरक्षण शासन राजपत्रात प्रसिध्द करणे | जिल्हाधिकारी | १३/०५/२०१९ (सोमवार) पर्यंत |

**टिप :- विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातील नोडल ऑफीसर यांनी प्रत्येक टप्प्यावरील कामकाजाबाबत आयोगास अहवाल सादर करावा.**

( किरण कुरुंदकर )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र